सत्यमेव जयते

# उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे

प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, ठाणे (पश्चिम) ४०० ६०४

☎-कार्या -२५८२ १४७४ : ई-मेल: ddhsthane@rediffmail.com

आरोग्यसेवा

जाक्र.कक्ष-९अ/वि.औ.भां/कुरीयर/पार्सल दरपत्रक मागणी/२६ 10922

दिनांक :- 23/03/2026

प्रति,

____________________

____________________

____________________

## दरपत्रक सूचना

विषय :- सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे येथून राज्यातील तसेच परराज्यातील आरोग्य संस्थांना वाटप करावयाची औषधे व औषधी साहित्य कुरीयर/पार्सल सर्विसने पाठविणेसाठी दरपत्रके मागवणेबावत.

संदर्भ :- या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.२३.३.२०२६

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागीय औषध व लस भांडारामध्ये केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या लसी, काविळ प्रतिबंधक औषधे, एमएएमजीपीए कडून प्राप्त होणारी औषधे, संतती प्रतिबंधक साहित्य मोठया प्रमाणावर प्राप्त होत असते. सदर औषधे व साहित्य मा.आयुक्तालयाच्या आदेशानुसार राज्यभरातील विविध आरोग्य संस्थांना तसेच काविळ प्रतिबंधक औषधे राज्यातील आरोग्य संस्थांना व केंद्र शासनाच्या आदेशान्वये परराज्यातील आरोग्य संस्थांच्या औषध भांडारांना पाठवावी लागतात.

सदर कामासाठी कुरीयर/पार्सल दर पुरविणेसाठी इच्छुक संस्था प्रमुखांकडून खालील विवरणपत्रात नमूद तपशिल व अटी शर्तीनुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr.No. | Description | Rate with GST (In Rupees) |
|---|---|---|
| 1 | Rates for providing Courier/Parcel Service all over Maharashtra (Rate per Kg including GST) | |
| 2 | Rates for providing Courier/Parcel Service all over India (Rate per Kg including GST) | |

दरपत्रके सादर करण्याचा कालावधी :- दि.२५.३.२०२६ पासून दि.२.४.२०२६ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत सार्वजनिक सुट्टया व शनिवार, रविवार वगळून

दरपत्रके उघडण्याचा दिनांक :- दि.६.४.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता

विहीत कालावधीत प्राप्त झालेली दरपत्रके उपस्थित असलेल्या संबंधित पुरवठादार संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींच्या समक्ष उघडण्यात येतील.

अटी व शर्ती :-

१) दरपत्रक हे संस्थेच्या लेटरहेडवर असावे.

२) नमुना प्रपत्रामध्ये दर नमूद करुन सदरील लेटर हेड हे संस्थाप्रमुखाची सही व संस्थेच्या शिक्कयासह, सिलबंद लखोटयात विहीत कालावधीत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकासोबत संस्थेच्या पत्त्याचा पुरावा, पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्राची स्वाक्षांकीत छायांकीत प्रत जोडण्यात यांवी अथवा CGST/SGST/IGST नंबरचा उल्लेख लेटरहेडवर असावा.

४) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेली व खाडाखोड असलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

५) दरपत्रके सादर करतांना लिफाप्यावर Quotation for Courier/Parcel Service Rate असे ठळक अक्षरात नमूद करुन लिफाप्यावर आपल्या संस्थेचे नांव व संस्थेचा शिक्का नमूद करणे आवश्यक आहे.

(डॉ.अशोक नांदापूरकर)
उपसंचालक
आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे

प्रत :- नोटीसबोर्ड